International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.8 No.3 Jan – Feb 2021

# भारतातील आर्थिक विषमता: एक गंभीर प्रश्न

**प्रा. डॉ. शिंदे एस. आर.**
(अर्थशास्त्र विभाग)
कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव ता. खटाव जि. सातारा
**Email:** sangramshinde730@gmail.com
**Corresponding Author: डॉ. योगीराज. एस. उरकुडे**

**प्रस्तावना:**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास किती प्रामाणात झालेला आहे हे महत्वाचे नसते तर त्या देशाच्या आर्थिक विकासाचे लाभ सर्वसामान्यापर्यन्त पोहचले आहेत किंवा नाही हे महत्वाचे असते. वाढत्या राष्ट्रीय उत्पन्नाबरोबरच देशातल्या नागरिकांचे दरडोई उत्पन्न वाढले पाहिजे, त्यांची क्रयशक्ती वाढत गेली पाहिजे असे झाले तरच देशाचे राष्ट्रीय उत्पन्न समान पद्धतीने वितरित झालेले आहे असे मानले जाते. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाचे एका विशिष्ट वर्गाला लाभ मिळत असतील तर देशात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे असा त्याचा अर्थ होतो. अलीकडच्या काळात जगातल्या बऱ्याच देशांनी **'कल्याणकारी राज्य'** निर्माण करण्याचे उद्दिष्टय ठेवलेले आहे आणि हे उद्दिष्टय साध्य करण्यासाठी संपत्तीचे संपूर्ण समाजामध्ये विकेंद्रीकरण झाले पाहिजे यासाठी प्रयत्न केले जात आहेत असे झाले तरच देशातल्या सर्वसामान्य नागरिकांपासून ते सर्वांना समान न्याय मिळू शकेल. परंतु जगातल्या जवळजवळ संपूर्ण देशांमध्ये आर्थिक विकासाची गती ज्या प्रमाणात वाढत आहे त्या प्रमाणात आर्थिक विषमता ही मोठ्या प्रामाणात वाढत असल्याचे दिसून येते.

भारतात आर्थिक विषमतेचे मूळ जाती व्यवस्थेत आहे. हिंदू धर्माने अगोदरच भारतातल्या बहुसंख्य लोकांना चार वर्णामध्ये विभागून उच्चनिचतेचा भाव निर्माण केला. इतकेच नाही तर कोणी कोणते काम करावे याबाबतही कठोर निर्बंध तयार केले. त्यामुळे व्यक्तीची योग्यता असूनही त्याच्या इच्छेप्रमाणे ते काम करू शकले नाहीत. त्यामुळे पूर्वीपासून ज्याला शिक्षणाचा अधिकार होता तोच वर्तमान काळात देशातील सर्व व्यवस्थेवर अधिराज्य गाजवत आहे. त्यांच्या हातातच सत्तेचे सारी सूत्रे आहेत. त्यामुळे देशात आजही सर्व देशवासियांना समान न्याय मिळू शकत नाही. परिणामी देशातल्या सर्वात जास्त असलेल्या लोकांच्या समूहाला पुढे जाण्याची संधी मिळत नाही आणि ज्यांना मिळते ते सर्वांचा हिस्सा हिसकावून घेत आहेत. परिणामी आर्थिक विषमता कमी न होता वाढत आहे.

जातीव्यवस्थेमुळेच शेतजमिनीचे वाटप मोठ्या प्रमाणात विषम प्रमाणात झाले. उच्च जातीतील लोकांकडे शेतजमिनीचा मोठा हिस्सा गेल्यामुळे त्यांची दडपशाही कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातीतील लोकांवर वाढत गेली. अधिक जमीन असणाऱ्या जमीनदारांचे उत्पन्न वाढत गेले आणि ज्यांच्याकडे जमिनी नाहीत ते आजही दुसऱ्यांच्या शेतजमिनीवर कसातरी उदरनिर्वाह करतात. त्यामुळे ते आजही गरीबच आहेत.महालनोबिस समितीच्या मते, १९५३-५४ मध्ये भारतातील वरच्या २० टक्के शेतकरी कुटुंबाकडे एकूण शेतजमिनीपैकी ७७ टक्के जमीन होती. त्यातही अत्यंत वरच्या ५ टक्के कुटुंबाकडे ४१ टक्के जमीन होती.

**उद्दिष्टे:**

१. भारतातील आर्थिक विषमतेच्या व्याप्तीचा आणि स्वरूपांचा अभ्यास करणे
२. आर्थिक विषमतेच्या कारणांचा अभ्यास करून त्यावरील उपाययोजना सुचविणे

**गृहितके :**

१. देशातील उच्च मानले गेलेल्या जातीत संपत्तीचे वितरण सर्वाधिक झालेले आहे. तर कनिष्ट समजल्या गेलेल्या जातीतील लोकांकडे देशातील संपत्तीचे कमी वितरण झालेले आहे.

२. देशातील आर्थिक विषमता कमी न होता वाढत आहे.

**व्याख्या:**

" संपत्तीचे वितरण समाजामध्ये जेव्हा असमान पद्धतीने होत असते तेंव्हा आर्थिक विषमता निर्माण होत असते."

भारतात संपत्तीचे वितरण कशा प्रकारे आणि किती प्रमाणात झालेले आहे यांचा विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल. श्री. **ओझा व भट्ट यांच्या** मते, " सन १९६१-६२ ते १९९३-९४ मधील पाहणीनुसार भारतातील राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा उच्च स्तरीय १० टक्के कुटुंबाचा हिस्सा ३५ टक्के होता. उलट खालच्या स्तरातील २० टक्के कुटुंबाचा हिस्सा ७ टक्के होता."

वरील आकडेवारीची वस्तुस्थिती विचारात घेतल्यास असे दिसून येते की, भारत देश फार मोठ्या संकटातून जात आहे. यावर वेळीच मर्यादा घातली तर देशातील उत्पन्न व संपत्तीचे विकेंद्रीकरण होवू शकेल. अन्यथा देशात आर्थिक विषमता प्रचंड वाढत जाईल . आणि होत आहे तसेच. आलिकडच्या काळात ज्या प्रमाणात देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत गेली त्याप्रमाणात आर्थिक विषमता वाढत गेली. ही बाब खालील तक्तामध्ये स्पष्ट केले आहे.


**तक्ता क्र. १ आर्थिक विषमता**

| | तळाच्या ५०% च्या संपत्तीचा सरासरी हिस्सा | शीर्ष १० % च्या संपत्तीचा सरासरी हिस्सा | शीर्ष १ % च्या संपत्तीचा हिस्सा |
|---|---|---|---|
| १९६१-१९७० | १२.२९ | ४३.१८ | ११.८७ |
| १९७१-१९८० | ११.७५ | ४२.२५ | ११.२३ |
| १९८१-१९९० | १०.९१ | ४५.०० | १२.५० |
| १९९१-२००० | ८.३६ | ५४.५७ | २३.३१ |
| २००१-२०१० | ८.१० | ५६.६० | २५.७० |
| २०११-२०२० | ६.१२ | ६३.६८ | ३१.५५ |

स्रोत: The World Inequality Database -WID

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, जास्त लोकांचा संपतीतील हिस्सा कमी होत गेला तर कमी लोकांचा संपतीतील हिस्सा वाढत गेलेला आहे.उदा. तळच्या ५० टक्के लोकांचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा १९६१-७० या दशकातील १२.२९ टक्के होता तो कमी होऊन २००१-२०१० या कालावधीत कमी होऊन ८.१० टक्के झाला. तर अति उच्च वरच्या १ टक्के लोकांचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा याच कालावधीत ११.८७ टक्क्यांवरून २५.७० टक्के एवढा वाढला आहे. हीच बाब खालील आलेखावरूनही सांगता येईल.

स्तंभलेख १.




स्रोत: The World Inequality Database -WID

अलीकडच्या काळात डिजिटल युग मानले जाते. संगणक, इंटरनेट इ. प्रत्येकांकडे असावे असे वाटत आहे. परंतु असे होत नाही. या साधनाच्या उपलब्धतेतही असमानता दिसून येते. २०१७ मधील राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणानुसार, केवळ 6% ग्रामीण कुटुंबांकडे आणि 25% शहरी कुटुंबांकडे संगणक आहे. ग्रामीण भागात फक्त 17% आणि शहरी भागात 42% लोकांना इंटरनेटची सुविधा आहे.

**जातींमधील विषमता**

अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) आणि इतर मागास जाती (ओबीसी) सारख्या उपेक्षित जाती गटांना राष्ट्रीय घरगुती उत्पन्नाच्या सरासरी 113,222 रुपयांपेक्षा खूपच कमी कमाई मिळते, तर SC आणि ST कुटुंबांची कमाई अनुक्रमे 21% आणि 34%, आहे जी राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. OBC कुटुंबांचे भाडे चांगले आहे परंतु तरीही वार्षिक भारतीय सरासरीपेक्षा 8% कमी कमावतात.

उच्चवर्णीय गटांमध्ये, ब्राह्मण राष्ट्रीय सरासरीपेक्षा ४८% अधिक कमावतात आणि ब्राह्मणेतर अग्रेषित जाती ४५% आहे.

अशा प्रकारे भारतात आर्थिक विषमतेची वरील आकडेवारीवरून कल्पना येते.

**भारतातील आर्थिक विषमतेची कारणे:**

भारतातील आर्थिक विषमतेच्या कारणांची चर्चा खालीलप्रमाणे करता येईल.

१. **नैसर्गिक विभागणी:**

भारतातील विविध राज्यात नैसर्गिक साधन संपत्तीचे वाटपच विषमपध्दतीने झाल्याचे दिसून येते. त्यामुळे ज्या राज्यात विपुल साधनसंपत्ती आणि नैसर्गिक अनुकूलता जास्त आहे ते राज्य विकसित आहेत तर काही राज्यात नैसर्गिक साधन संपत्तीचा अभाव आहे आणि त्या राज्यात किंवा भागात नैसर्गिक प्रतिकूलता आहे अशी राज्य मागासलेली आहेत असे दिसून येते.उदा. केरळ, महाराष्ट्र आणि राजस्थान,बिहार.

२. **वारसा हक्क:**

भारतात वारसा हक्कास कायद्याने मान्यता दिली आहे. वारसा हक्काने वडीलोपार्जित संपत्ती मुलाला मिळत असल्यामुळे मुलगाही श्रीमंत होतो. तर गरिबांच्या मुलाला त्याच्या वडिलांच्या कर्जाची परतफेड करावी लागते. त्यामुळे श्रीमंत हा श्रीमंत होतो तर गरीब हा गरीबच राहतो. त्यामुळे आर्थिक विषमता वाढत जाते.

३. **संपत्तीची विषम वाटणी**

मुळातच भारतातील संपत्तीची विषम वाटणी झालेली आहे. जमीन, उद्योगांची मालकी, शेअर्सची मालकी इ. उदा. १९५९-६० मध्ये वरच्या २० टक्के शेतकरी कुटुंबाकडे देशातील एकंदर जमीनीपैकी ७५ टक्के जमीन होती. तर देशातील ५ टक्के शेअर्स धारकांच्या मालकीचे ५० टक्के शेअर्स होते.

४. **असमान संधी:**

देशातील सर्व लोकांना समान संधी मिळत नसते. ज्यांना सर्वोत्तम संधी मिळत असते त्याला चांगली नोकरी, व्यवसाय करता येतो आणि ते श्रीमंत बनतात. परंतु ज्यांना चांगली संधी मिळत नसते अशा लोकांना गरीबच रहावे लागते. अर्थात श्रीमंतांना श्रीमंत बनण्याची संधी मिळत असते तर गरिबांना तशी संधी मिळत नाही म्हणून ते गरीबच राहतात.

५. **मक्तेदारी शक्तीचे प्राबल्य वाढत आहे.**

नवीन आर्थिक धोरणांमुळे आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण वाढत आहे. त्यामुळे देशात वस्तू व सेवांच्या किंमती वाढत आहेत. त्यातून श्रीमंत हे श्रीमंत होत आहेत तर गरीब हे गरीबच होत आहेत.

६. **कर चुकवेगीरीचे प्रमाण जास्त:**

कर चुकवेगीरीमुळे आर्थिक विषमता वाढत जाते असे म्हटले जाते. करदराच्या वाढीमुळे करदाते कर व्यवस्थित भरत नाहीत त्यामुळे तेवढे त्यांचे उत्पन्न वाढलेले असते असा त्याचा अप्रत्यक्ष अर्थ होतो.

७. **भ्रष्टाचार :**

असे म्हटले जाते की ज्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे प्रमाण जेवढे जास्त होते तेवढी आर्थिक विषमता वाढत जाते. भारतात भ्रटाचाराचे प्रमाण सातत्याने वाढत आहे त्यामुळे एक विशिष्ट वर्गाच श्रीमंत होत आहे तर गरीब हे गरीबच होत आहेत.

८. **दारिद्र्य:**

प्रा. नर्क्स यांच्या मते गरीबीचे कारण गरीबी आहे. याचाच अर्थ श्रीमंत हे श्रीमंत होत आहेत आणि गरीब हे गरीबच राहत आहेत आणि ही स्थिती दीर्घकाळ टिकून राहणे त्यामुळेही आर्थिक विषमता वाढत **राहते.**

याशिवाय वेतनातील भिन्नता, बँकांची उपलब्धता, कर्जाचा भार, चलनवाढ इ. मुळे देशात आर्थिक विषमता वाढत आहे.

**आर्थिक विषमता कमी करण्याचे उपाय:**

आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सर्वात चांगला उपाय म्हणजे श्रीमंतकडून अतिरिक्त पैसा काढून घेणे आणि तो गरीबामध्ये वितरित करणे आणि ही प्रक्रिया तोपर्यंत चालू ठेवली पाहिजे जोपर्यंत आर्थिक समता प्रस्तापीत होत नाही. तरीपण आर्थिक विषमता कमी करण्यासाठी काही महत्वाचे उपाय खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. जमीन धारणेचे प्रमाण किमान करणे:

भारतातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी जमिनीचे धारणक्षेत्र मर्यादित करणे गरजेचे आहे. ज्यांच्याकडे प्रमाणापेक्षा जास्त जमीन आहे त्यांच्याकडून काढून घेऊन भूमिहीन शेतकऱ्यांना तिचे वाटप करणे गरजेचे आहे.

२. वारसा हक्क मर्यादित करणे

वारसा हक्काने मिळालेली संपत्ती मुलांना किती मिळावी याबाबतही मर्यादा असावी.यासाठीच भारत सरकार मालमता कर, देणगी कर मृत्यू कर असे कर आकारण्याचा प्रयत्न करत असते.

३. प्रगतिशील कर प्रणालीचा अवलंब करणे

देशातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी प्रगतिशील कर आकरणी करावी लागेल. कारण यासारख्या कर प्रणाळीमुळे अतिरिक्त पैसा असणाऱ्याकडून जास्त पैसा काढून घेता येईल आणि तो गरिबांमध्ये वाटप करता येईल.

४. गरीबी निर्मूलनासाठी योजना राबविणे

गरीबी कमी होण्याबरोबरच गरिबांच्या उत्पन्नाथी वाढ झाली पाहिजे अशा शासकीय योजनांची अंमलबजावणी केली पाहिजे.

५. मक्तेदारी नियंत्रण कायदा: भारतात सन १९६५ साली मक्तेदारी नियंत्रण कायदा केलेला होता. अशा प्रकरचे काही कायदे केल्यास संपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही.

६. श्रमप्रधान उद्योगांची उभारणी केल्यास गरिबांना रोजगार मिळून त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल .

७. रोजगार वाढीसाठी अनेक योजना रबविणे गरजेचे असते

८. भाववाढीवर नियंत्रण ठेवणे

तसेच रोजगार हमी योजना, अंत्योदय अन्न योजना यासारख्या उपायांची अमलबजावणी केल्यास देशातील आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होऊ शकते.

अशा प्रकारे देशात आर्थिक विषमता कमी करण्यासाठी कठोर प्रयत्न केल्यास आर्थिक विषमता कमी होऊ शकेल.

**गृहितकृत्याची पडताळणी** केली असता असे दिसून आलेले आहे की संशोधकाने जी गृहीते विचारात घेतली होती टी प्रत्यक्षात येताना दिसून येतात. कारण देशातील आर्थिक विषमता कमी न होता वाढत आहे हे आपण तक्ता क्र. १ मध्ये पाहू शकता. तसेच देशात कनिष्ट मानले गेलेल्या लोकांकडे संपतीचा कमी व उच्च मानले गेलेल्या लोकांकडे जास्त हिस्सा वितरित झालेला आहे असे वर उल्लेख केल्याप्रमाणे सिद्ध होते.

**संदर्भसूची ग्रंथ:**

1. मानव विकास अहवाल. असमानता-समायोजित मानव विकास निर्देशांक (IHDI) वेबॅक मशीन येथे 12 जुलै 2019 रोजी संग्रहित . *संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम* . पुनर्प्राप्त: मार्च 3, 2019.
2. *उत्पन्नाच्या जागतिक वितरणाचे पॅरामेट्रिक अंदाज" . 22 जानेवारी 2010.*
3. *आर्थिक विषमतएं (Economic Inequality चे हिंदी अनुवाद) -अमर्त्य सेन*
4. *भारताच्या आर्थिक समस्या- आर्थिक विकास आणि नियोजन डॉ. मधुसूदन साठे भाग ४*
5. व्यावसायिक पर्यावरण-डॉ. एस. एम. भोसले, डॉ. आर. जी. कोरबू, प्रा. जे. ए. यादव
6. भारतीय अर्थव्यवस्था-प्रा. के. एच. ठक्कर (फडके प्रकाशन)
7. India Economy -S.K.Mishra, K.V.Puri
8. Economic History of India-Radhakamal Mukharjee
9. The World Inequality Database -WID

10. https://education.vikaspedia.in/viewcontent/education/childrens-corner/
11. https://en-m-wikipediaorg.translate.goog/wiki/Social_inequality?_x_tr_sl=en&_x_tr_tl=mr&_x_tr_hl=mr&_x_tr_pto=tc
Wealth Inequality, Class and Caste in India, 1961-2012 Nitin Kumar Bharti November 2018